# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०४/०२/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २ | वसई विरार उपप्रादेशिक पाणी पुरवठा योजना सुर्या टप्पा - १ व २ अंतर्गत काशिद कोपर येथील मुख्य संतुलन टाकी व शुद्ध पाण्याची गुरूत्ववाहिनीस रंगकाम करणे कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामास अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| ३ | वसई विरार उपप्रादेशिक पाणी पुरवठा योजना सुर्या टप्पा-१ धुकटन येथील जलशुद्धीकरण केंद्रामधील फिल्टर बेड क्र. २ ते ८ मधील गाळणी माध्यम (फिल्टर मिडीया) पुर्नभरणी करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे. | **ठराव :-** वरील प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामास अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री.चंद्रकांत गोरीवले** |
| ४ | अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक खर्च बाब अंतर्गत आरोग्य सोयी व पाणीपुरवठा अंतर्गत शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद रक्कममधून आरोग्य सोयी व पाणीपुरवठा अंतर्गत उसगांव पाणीपुरवठा योजना जनित्र दुरूस्ती या लेखाशिर्षामध्ये तरतुद रक्कम | **ठराव :-** अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक २०१५-१६ खर्च बाब आरोग्य सोयी व पाणीपुरवठा अंतर्गत शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी या लेखाशिर्षाअंतर्गत शिल्लक तरतूद रक्कम रू.१,२१,४०,१२२/- मधून रक्कम रू. ५,००,०००/- (५ लक्ष) आरोग्य सोयी व पाणीपुरवठा अंतर्गत उसगांव पाणीपुरवठा योजना जनित्र दुरूस्ती या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनोयजनाद्वारे वर्ग करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री..प्रकाश रॉड्रीक्स** |

| | | |
|---|---|---|
| | पुनर्विनियोजनाद्वारे वर्ग करणेबाबत. | |
| ५ | अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक खर्च बाब अंतर्गत आरोग्य सोयी व पाणीपुरवठा अंतर्गत शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद रक्कममधून आरोग्य सोयी व पाणीपुरवठा खर्चा अंतर्गत शहरांतर्गत योजनेसाठी जनित्र दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये तरतुद रक्कम पुनर्विनियोजनाद्वारे वर्ग करणेबाबत. | **ठराव :-** अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक २०१५-१६ खर्च बाब आरोग्य सोयी व पाणीपुरवठा अंतर्गत शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी या लेखाशिर्षाअंतर्गत शिल्लक तरतूद रक्कम रू.१,३१,४०,१२२/- मधून रक्कम रू. १०,००,०००/- (१० लक्ष) आरोग्य सोयी व पाणीपुरवठा खर्चा अंतर्गत शहराअंतर्गत योजनेसाठी जनित्र दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनोयजनाद्वारे वर्ग करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स** |
| ६ | महानगरपालिका हद्दित समाविष्ट असलेल्या विद्यालयातील इयत्ता ९ वी १० वी च्या मुलांकरीता अभ्यास व स्मरणशक्ती या विषयावर मार्गदर्शन मेळावे आयोजित करणेबाबत. | **ठराव :-** याकामी मा.महिला बालकल्याण समिती सभा ठराव क्र.६ दिनांत २१/१२/२०१५ अन्वये मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने सदर योजना चांगली असून इयत्ता ९ वी ते १० वी च्या मुलांकरीता महापालिका हद्दीतील महापालिकेकडे नोंद असलेल्या विविध शाळांमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत यावे. याकामी ई-निविदा प्रक्रिया करण्यांत यावी. मंजूर निविदाधारकांकडून कार्यक्रमाचे आयोजनाबाबत अहवाल मागविण्यांत यावा. सदर योजना इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून ज्या भागातील शाळेत गरीब व आदिवासी मुलांचा समावेश आहे. अशा शाळांना प्रथम प्राधान्य देण्यांत यावे व त्याबाबत यादी सादर करणे आवश्यक असणार आहे. याकामी गोषवाऱ्यात नमुद केल्याप्रमाणे प्रति कार्यक्रम कमाल रक्कम रू. ३,०००/- याप्रमाणे एकूण १६४ शाळांमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करणे कामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रू.४,९२,०००/- अपेक्षित खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समिर डबरे सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| ७ | वसई समता या वृत्तपत्रात प्रसिद्धीसाठी दिलेल्या जाहिरातीच्या दराबाबत आलेल्या पत्रावर विचार करणे. | **ठराव :-** विषयाचा गोषवारा उपलब्ध न झाल्याने विषय तहकुब ठेवणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव** |
| ८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ नुसार सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी कर व दर निश्चित करणे. | **ठराव :-** सदर विषयाबाबत मा.स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यांत आली. प्रचलित कर व दरात कोणताही बदल न करता सध्याचेच म्हणजेच सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात लागू असलेले कर व दर सन २०१६-१७ साठी लागू करावेत. अशी शिफारस मा.महासभेस करावी, असा निर्णय घेण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |